**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११६/२०१४ मधील नि.४१ खालील आदेश</u>**
**<u>गोपाळ देवाडीगा मयत तर्फे वारस वि. शैला चव्हाण वगैरे</u>**
**<u>CNR NO. MHST050004922014</u>**

मूळ अर्ज भाडे नियंत्रण कायदा अंतर्गत वाजवी भाडे ठरवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. नि.१२ वर सामनेवाली क्र.२ पुष्पा महादेव गुढेकर यांनी म्हणणे दिलेले आहे. सदर म्हणण्यावर दि.१६.०१.२०१५ रोजी seen and filed असा आदेश पारीत झालेला आहे. सदरचा अर्ज दाखल करुन अर्जदार यांनी अशी हरकत घेतली आहे की, नि.१२ वरील म्हणणे seen and filed झाले असल्यामुळे सामनेवाली क्र.२ यांनी सामनेवाली क्र.१ ची कैफीयत व म्हणणे स्वीकृत करणेबाबत पुरसीस दाखल केलेली नाही. त्यामुळे त्याबाबत आदेश होण्याची विनंती केली आहे.

०३. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले.

०४. सदरचे प्रकरण सन २०१४ साली दाखल केलेले आहे. सदरचे प्रकरण तपासणी अहवाल व ॲक्शन प्लॅनमधील आहे. सदरचे प्रकरण चौकशीकरीता आहे. परंतु सदरचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. नि.१२ चे अवलोकन केले असता त्यामध्ये स्पष्ट शब्दात असे नमूद केले आहे की “यातील वि.प.नं.२ तर्फे अर्जदाराचे अर्जास लेखी म्हणणे खालीलप्रमाणे” यावरुनच नि.१२ वरील दाखल म्हणणे हे सामनेवाली क्र.२ हिची कैफीयतच आहे. नि.१२ चे अवलोकन केले असता ते कैफीयतच्या स्वरुपातच दिलेले आहे. त्यामुळे त्याबाबत वेगळे निर्देश देण्याची कोणतीही आवश्यकता नाही. त्यामुळे अर्जदार यांचा अर्ज चालण्यास पात्र नाही.

वेळोवेळी प्रकरण जुने असून चौकशीकरीता आहे असे सांगूनही सदरचा अर्ज केवळ प्रकरण लांबविण्याकरीता दिलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात येतो. पुढील तारखेस अर्जदारतर्फे पुरावा सादर करण्यात आला नाही तर प्रकरण खारीज करण्यात येईल.

JYOTI JAGNNATH MANE

Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2026.02.04 13:12:49 +0530

ठिकाणः कराड ( जे.जे.माने )

दिनांकः ०२.०२.२०२६ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड.